# <u>यशोगाथा</u>

# उत्तम पशुसंगोपनातून दुग्धव्यवसायात प्रगती




श्री. बळवंतराव यशवंतराव पाटील मु. मलकापूर ता. उदगीर जि. लातूर वय वर्षे ६२, तरूणाला लाजवेल असा उत्साह असलेले व्यक्तिमत्व यांनी दुग्धोत्पादनातून प्रगती साध्य करून परिसरातील शेतक-यापुढे एक आदर्श निर्माण केला आहे. सन १९७४ मध्ये मास्टर ऑफ सोशल वर्कर ची पदवी त्यांनी संपादन केली असून अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर येथे सुरूवातीचे ६ महिने विस्तार अधिकारी म्हणून नोकरी सुद्धा केली. परंतु गावाकडे उदगीर शहरालगत असलेली वडिलोपार्जित ८० एकर जमीन व शेतीव्यवसायाची असलेली आवड यामुळे सरकारी नोकरी सोडून १९७५ पासून शेतीकडे वळले.

केवळ शेतीपिकातून आर्थिक बरकत अशक्य असल्याचे जेव्हा त्यांच्या लक्षात आले, तेव्हा २०१० मध्ये दुधाळ जनावरे सांभाळणे सुरू केले. त्यांचा परिवार व मुलगा या व्यवसायास त्यांना हातभार लावतात. दुधाळ जनावरांची जास्त संख्या असून चालत नाही तर अधिक दुध उत्पादन देणारी जनावरे गोठयात हवी म्हणून अहमदनगर जिल्हयातील घोडेगांव तसेच उदगीर परिसरातून तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून उत्तम वंशावळीच्या म्हशींची त्यांनी निवड करून खरेदी केली. आज त्यांचेकडे १५ म्हशी, ५ गायी, १२ वासरे, १२ खोंडे आणि ४ बैल असे एकूण ४८ जनावरे आहेत. म्हशीमध्ये मु-हा व सुरती वाणाच्या प्रजातीचे ते संगोपन करतात. इतक्या जनावरासाठी अतिशय हवेशीर जागेत पत्र्याचे छत असलेले सिमेंट कांक्रिटचा ६०X१०० चौ. फूट आकाराचा गोठा त्यांनी टप्प्याटप्प्याने बांधला. सप्रमाण दावण (गव्हाण) सोबत जनावरांना बसण्यासाठी व उभे राहण्याकरीता ऐसपैस जागा, अतिशय सहजतेने मलमूत्राची स्वच्छता करता येईल तसेच सकाळ व संध्याकाळचा सुर्यप्रकाश गोठयात पडेल अशा पद्धतीने गोठयाची रचना केली आहे.

उत्तम जनावरांसोबत तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून शास्त्रीय पद्धतीचा ते अवलंब करतात. गोठयाची व जनावरांची स्वच्छता अतिशय कटाक्षाने जोपासली जाते. नियमितपणे जनावरांचे जंतनाशन, लसीकरण केले जाते. स्वच्छतेमुळे स्तनदाह, गर्भाशयदाह, गोचिड गोमाशांना पायबंद घातला आहे. जनावरांना सप्रमाण रोज हिरवा व वाळलेला चारा कुट्टी करून दिला जातो. हिरव्या चा-याकरीता पशुवैद्यक महाविद्यालय, उदगीर येथून धारवाड नेपियर या वाणाचे बेणे आणून त्यांची १ एकर जागेत लागवड केली असून त्यापासून रोज सर्व जनावरांना पुरेल इतका हिरवा चारा वर्षभर मिळतो. चारा बचतीकरीता कुट्टी यंत्राची त्यांनी खरेदी केली आहे. पशुखाद्यात सरकीपेंड किंवा सोयाबीन पेंड यासोबत मका भरडा, हरभरा चुन्नी, खनिज मिश्रण पाण्यात भिजवून जनावरांना देतात. धान्याचा भरडा करण्यासाठी गिरणीयंत्र सुद्धा त्यांनी खरेदी केले आहे. आजमितीस त्यांच्याकडे असलेल्या १५ म्हशीपैकी १० म्हशी दुधावर असून त्यापासून रोज १२५ लिटर दुध उत्पादन मिळते. उत्तम दुधाची प्रत व लागून असलेले उदगीर शहर यामुळे सर्व दुधाचा विनासायास घरूनच रू. ५० प्रतिलिटर या दराने खप होतो. मासिक दुध उत्पन्नातून मजूरी, खाद्य, चारा, वीज, पशुवैद्यकीय सेवा, औषधोपचार यावर रूपये ८५००० हजार खर्च वजा जाता दर महिन्याला १ लाख २ हजार पाचशे रूपये पदरी पडतात. सोबत महिन्याला शेतीपिकाला ८ ट्रॅक्टर शेणखत मिळते.





**मार्गदर्शक:** डॉ. अनिल भिकाने, विभाग प्रमुख, पशुचिकीत्सा औषधोपचार विभाग, पवैम, उदगीर
**लेखन:** डॉ. नरेन्द्र खोडे, सहाय्यक प्राध्यापक, प. वि. व प. सं. विस्तार शिक्षण विभाग, पवैम, उदगीर